PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 7, ISSUE 3

# ग्रामीण कथांमधून दर्शित होणारा समाज आणि संस्कृती

**प्राचार्य डॉ. ह. रा. जाधवर**
सरहद्द कॉलेज, कात्रज, पुणे
**महाराष्ट्र भारत**

प्रस्तावना

ग्रामीण कथा या प्रामुख्याने महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनविश्वाच्या पार्श्वभूमीवर साकारलेले असल्यामुळे त्यांच्या कथालेखनातून समाज आणि संस्कृती यांचे चित्रण आले आहे. वाचकांशी संवाद साधण्याचे सामर्थ्य समोर येते. ना. सी. फडके म्हणतात, 'तुम्ही मोठे कथाकार होणार की नाही हे अखेर तुम्ही तंत्राचा अभ्यास किती केला आहे याच्यावर अवलंबून नाही, तुम्ही कोणत्या नामांकित लेखकाची शैली उचलली याच्यावर तर मुळीच नाही. तुमचा अनुभव किती समृद्ध आहे, तुमचं स्वतःचं व्यक्तिमत्त्व किती विविध आणि चित्तवेधक आहे, तुमचं अंतःकरण किती विशाल आहे आणि वाचकाच्या अंतःकरणात किती समावलं आहे यावर अवलंबून आहे!' लेखिकेचे व्यक्तिमत्त्व असेच विविधतेने भरलेले आणि भारलेले तसेच चित्तवेधक आहे.

ग्रामीण भागातील शेतीव्यवसाय, शेतीशी केंद्रित असलेले समाजजीवन, अजूनही जपली गेलेली जातिभेदाची दरी, आर्थिकदृष्ट्या सबळ असलेले जमीनदार, वतनदार, पाटील, कुलकर्णी आणि त्यांचे गरीब वर्गातील लोकांबरोबरचे मग्रूर आणि क्रूर पद्धतीचे वर्तन, स्त्रियांवर होणारे अत्याचार, खेड्यातील विवाह, या विवाहांमधील हुंडापद्धती आणि विवाहानंतरही हुंडाप्रथेमुळे निर्माण होणार्या समस्या, गावागावातील आणि भावाभावांतील भाऊबंदकी, संपत्ती तसेच इतर कारणांवरून त्यांच्यामध्ये होणारी भांडणे, पोलिसकेस, कोर्टकचेरी, शिक्षण घेणारी नवी पिढी, त्यांच्या शिक्षणामध्ये आणि शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी

मिळविण्यामध्ये येणारी बाधा, घरकाम आणि शेतीकाम, मोलमजुरी यांच्या कायमच्या ओझ्याखाली पार दबलेल्या स्त्रिया, गावांमधील गुंडगिरी, सण, उत्सव, सोहळे, मुक्या जनावरांवर लोकांचे असलेले विलक्षण प्रेम, गावांमध्ये शिरलेले राजकारण आणि त्यामुळे निर्माण होणारी परिस्थती, खेड्यातील वेगवेगळी नातीगोती, त्यांचे परस्परसंबंध स्त्री-पुरुष यांचे संबंध, निसर्ग, ऋतुचक्र, पुरुषांची व्यसनाधीनता आणि त्यांचा बाहेरख्यालीपणा, शिक्षण क्षेत्रातील अराजक नवकाल प्रवाहानुसार प्रामाणिकपणे काम करणा–या माणसाची होणारी गळचेपी, श्रद्धा-अंधश्रद्धा, कुटुंबव्यवस्था अशा निरनिराळ्या रेखाटनातून लेखिकेने विदर्भातील खेड्यातील समाज आणि संस्कृतीचे अत्यंत संवेदनशील चित्रण आपल्या कथालेखनातून केले आहे.

या कथालेखनातील समाज आणि सामाजिकता याबद्दल आपले मत व्यक्त करताना अंजली सोमण म्हणतात, माट्यांच्या कथेप्रमाणे प्रतिमा इंगोले यांच्या कथेला प्रबोधनाचे अंग आहे. कथेतून व्यक्त होणारा त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोन व्यापक, मानवतावादी आहे. ग्रामीण जीवनातील अनुभवांना त्यांच्या कथेत महत्त्वाचे स्थान असूनही जीवनदृष्टीतील संकुचितता, पूर्वग्रहदूषित किंवा शहर विरूद्ध खेडे सरळसोट विभागणी करण्याचा एकारलेपणा त्यांच्या कथेत येत नाही. ग्रामीण जीवनातील दुःखाची त्या अशी सोपी उत्तरे काढीत नाहीत तर जीवनाचा समग्रपणे विचार करून ग्रामीण जीवनातील दुःखाची कारणे समाजव्यवस्थेत शोधण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांची कथा आधीच्या कथेच्या ग्रामीण कथेचा पुढचा टप्पा ठरते. जीवन व्यवहारातील समग्रतेचे भान असल्यामुळे आणि दृष्टिकोन प्रचारकी नसल्यामुळे प्रबोधनाचे अंग असूनही त्यांच्या कथा अकलनात्मक किंवा प्रचारकी होत नाहीत.

या कथालेखनातून ग्रामीण समाज आणि संस्कृती यांचा वास्तव पडताळा येतो. शिक्षणामुळे, औद्योगिक परिवर्तनामुळे जो बदल ग्रामीण पातळीवर होत आहेत त्यांचे दर्शनही या कथांतून घडते. ग्रामीण लोकजीवन आणि लोकसंस्कृती यांतील विविध अनुभवांचे कथन खास अशा व–हाडी बोलीमधून करतात. मुग्ध भविष्यामुळे आणि पतिप्रेमाने फुलून आलेल्या तरुणी, त्यांची मानसिकता आणि संसारात गुंतून पडल्यावर त्यांच्या वाट्याला येणारे विविध ताणतणाव या सर्वांचे नाट्यपूर्ण प्रवाही आणि गतिमान असे चित्र कधी व्यक्तिचित्रणातून तर कधी प्रसंगवर्णनातून त्यांनी रेखाटले आहे. आपल्या कथांमधून कधी सूक्ष्म तपशील आणि कधी म्हणी-वाक्प्रचार यांचेही उपयोजन केलेले आहे. स्त्रियांमधील अज्ञान आणि अंधश्रद्धा यांचे प्राबल्य आणि माहेरच्या परिस्थितीमुळे व सासरच्या वागणुकीमुळे त्यांच्या वाट्याला येणारी सुख-दुःखे यांचे वर्णन त्या संवेदनशीलतेने करतात.

त्यांच्या अनेक कथांमधून ग्रामीण भागातील संस्कृतीचे चित्रण आले आहे. विदर्भात पुरुषाला महादेव आणि स्त्रिला पार्वती असे संबोधले जाते. ('हजारी बेलपान' ) रंगपंचमीचा सण ग्रामीण भागातही मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. एकमेकांवर रंग टाकणे, थट्टा-मस्करी असे प्रकार रंगपंचमीच्या दिवशी चालतात. ('धुयमाती' ) गावातील कोणत्याही मुलीच्या डोक्यावर अक्षदा टाकल्या की ती सर्व गावाचीच मुलगी होते. तिच्या संकटसमयी सर्वजण अगदी शत्रूही मदतीला धावतो अशी प्रथा आजही आहे. ('अकसिदीचे दाने' ).

शेतक–याचे जीवन शेतीतील कामांमुळे ब–याच प्रमाणात बैलांवर आधारलेले असते. त्यामुळे बैलपोळ्याच्या दिवशी बैलाची मिरवणूक काढतात ('दारका' ). मांगिणीने बाळंतपण केले की तिला दक्षिणा, कापडचोपड देऊन तिची बोळवण करण्याची प्रथा खेडेगावात आहे ('वटी' ). गाईला ग्रामीण संस्कृतीत मोठा मानसन्मान आहे. कोणत्याही परिस्थितीत गाईला खाटकाकडून कत्तलखान्यामध्ये शेतकरी जाऊ देणार नाहीत ('डोयाचा खेय' ) शेतकरी समाजाने पाळलेल्या, परंपरेने चालत आलेल्या परंपरा यांचाच समावेश त्यांच्या संस्कृतीमध्ये प्रामुख्याने होतो.

या कथालेखनातील सामाजिकतेबद्दल अनुराधा गुरव म्हणतात, प्रतिमा इंगोले यांची प्रत्ययकारी लेखणी साध्यासुध्या माणसांच्या अनुभवांच्या माध्यमातून मानवी जीवनाला अंधारणा–या सामाजिक, कौटुंबिक, शासकीय, कार्यालयीन, अंधश्रद्धा, परंपराविषयक, आर्थिक व्यावसायिक समस्यांच्या गाभ्याला वाचकांना थेट भिडवते. कर्णकटू, कर्कश, विद्रोहपूर्ण शैली नसतानाही या कहाण्या सुन्न करतात. स्वतःच्या दैन्य, अडचणी, दुःख, समाजव्यवस्था इत्यादींबद्दल उकलणारे भाव व्यक्त न करणारी पात्रे स्वातंत्र्य याचा लाभ नागरिकांना न झाल्याने शासनसमाज अपयशी ठरल्याचे प्रभावीपणे जाणवून देतात. गदारोळ न माजविता मानवी मूल्ये, माणुसकी इत्यादींपासून माणूस किती दूर भरकटत निघाला आहे हे स्पष्ट करण्याची लेखिकेची निपुणता मननीय आहे.

ग्रामीण जीवन जवळून अनुभवल्यामुळे ग्रामीण समाजनिष्ठ जाणिवांतून त्यांचे कथालेखन साकार झालेले आहे. ग्रामीण माणसाच्या जाणिवेला, इच्छा-आकांक्षांना त्यांच्या सुख-दुःखांना, स्त्री-पुरुषांच्या भावविश्वाला, त्यांनी आपल्या कथांमधून चित्रित केले आहे. प्रभावी समूहमन, त्यामध्ये होणारी व्यक्तिमनाची कुचंबणा तेथील संस्कृती, रीती-परंपरा, मानपान यांना आपल्या कथांमधून प्रत्ययदर्शीपणे अधोरेखित करतात. वैदर्भीय समाजातील जनमानसाची स्थिती-गती, जीवनपद्धती, त्यांची अस्मिता, या माणसांचा तोकडेपणा, शेतकर्याची दयनीय अवस्था ('पेरणारे हात' ) सामाजिकता आणि कौटुंबिकता यातून ग्रामीण जीवनाची लय साधत लेखिकेने आपल्या सूक्ष्म निरीक्षणाने आणि विचारांनी लालित्यपूर्णतेने आरेखित केले आहे. त्यांची प्रत्येक कथावस्तू स्वतंत्र विषयाची असून त्यामध्ये विविधता संपन्नतेने आलेली आहे.

अशाप्रकारे त्यांची कथा निखळ ग्रामीण समाजजीवनाचा आणि संस्कृतीचा वेध घेऊन अनुभवांचा चित्तवेधक आणि कलात्मक आविष्कार घडविते. तेथील समाज आणि संस्कृतीचे त्या अत्यंत तरलतेने आणि संवेदनशीलतेने चित्रण करतात. कालप्रवाहाप्रमाणे ग्रामीण भागामध्ये होणारे परिवर्तन व त्याचा परिणाम यांचाही आविष्कार त्यांच्या कथांमधून स्पष्टपणे दिसतो.

कथांमधील स्त्री दुःखाची विविध रूपे प्रतिमा इंगोले यांच्या कथा ज्याप्रमाणे ग्रामीण आहेत त्याचप्रमाणे त्या स्त्रीवादीदेखील असल्याचे आपण पाहिले आहे. त्यांच्या कथांमध्ये प्रामुख्याने विदर्भातील विविध खेड्यापाड्यांतील स्त्रियांचे प्रश्न समस्या यांचे ज्वलंत तसेच वास्तवदर्शी चित्रण आहे. त्यांच्या कथांमधील बहुतेक स्त्रिया भावनाप्रधान असून कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या दुःखाने त्या पीडित आहेत. सुखाचे क्षण नियतीनियमानुसार वाट्याला आलेल्या फार थोड्याच स्त्रिया त्यांच्या कथांमध्ये दिसतात. असे

असले तरी त्यांची कथा म्हणजे स्त्री दुःखाचे गाऱ्हाणे ऐकणारी आणि स्त्री समस्यांची रडगाणी गाणारी कथा होत नाही. त्यांच्या कथांतील बहुतांश स्त्रिया कोणत्याही प्रकारचा आक्रस्ताळपणा न करता किंवा समाजमनाविरोधात कोणतेही आगाऊपणाचे पाऊल न उचलता आल्या परिस्थितीला सामोरे जाणाऱ्या आहेत. काही स्त्रिया मात्र त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराविरोधात आवाज उठवू पाहणाऱ्या आहेत म्हणजेच स्त्रीमुक्तीच्या दिशेने त्यांची वाटचाल सुरू आहे.

या कथांमधून स्त्री-दुःखाची विविध अशी रूपे रेखांकित झाली आहेत. त्यांच्या कथांतील बऱ्याचशा स्त्रियांच्या दुःखांचे मूळ कारण पुरुषप्रधान संस्कृतीच असल्याचे प्राधान्याने दिसते. पुरुषांची व्यसनाधीनता, त्यांचे परस्त्रीसंबंध आणि पुरुषी अहंकार अशा कारणांमुळे स्त्रियांना दुःखाला सामोरे जावे लागते आहे. अन्यायकारक अशी हुंडापद्धती हीदेखील स्त्रियांच्या दुःखाचे कारण बनते आहे. आर्थिक परिस्थिती गरिबीची असल्याने आणि ते हुंडा देण्यास असमर्थ ठरत असल्याने अनेक स्त्रियांना कधी विवाहापूर्वी तर कधी विवाहानंतर मृत्यूला जवळ करावे लागते आहे. कित्येक मुलींच्या वैवाहिक जीवनाविषयीच्या स्वप्नांना तडा जातो आहे. ('मियाँ बिबी राजी' , 'सोन्याचा गोफ' , 'डुबतीची पावले' , 'सपन' ). स्त्रियांच्या दुःखाची अशी रूपे आपल्यासमोर येतात. पुरुषांची परस्त्री भोगलालसा घरच्या स्त्रीवर संकट ओढवून आणते. ('नागवेल' , 'हव्यास' , 'कल्लोळ' , 'मंगळसूत्र' , 'जावायांचे पोर' ). तरीदेखील स्त्रिया सोशिक वृत्तीने सर्व सहन करतात. अंधश्रद्धेने काही स्त्रियांना दुःखाला सामोरे जावे लागते ('भिकीचे कपळे' , 'ठानं बाई अवचित' , 'चोरावर मोर' ). गरिबी आणि श्रीमंती यांच्यातील भेदभाव ('परायाची लेक' ), जातीधर्माला अनुसरून खालच्या जातीतील स्त्रियांनादेखील मार सहन करावा लागतो ('वटी' ) अशा प्रकारे विविध कारणांनी निर्माण होणारी स्त्री-दुःखाची विविध रूपे त्यांनी आपल्या कथांमधून चितारली आहेत.

त्यांच्या कथांमधील दुःखाला सामोरे जाणाऱ्या स्त्रिया विविध वर्गातील तसेच विविध क्षेत्रातील आहेत. काही स्त्रिया सुशिक्षित आहेत तर काही स्त्रिया अशिक्षित आहेत. काही स्त्रिया आर्थिक दृष्टीने गरीब परिस्थितीतील तर काही स्त्रिया श्रीमंत घराण्यातील आहेत. काही स्त्रिया निमूटपणे दुःख सहन करणाऱ्या, काही स्त्रिया दुःखापासून दूरस्थ स्वतःच्या जीवनाची वाट शोधणाऱ्या तर काही स्त्रिया अन्यायाविरूद्ध आवाज उठविणाऱ्या आहेत. यातील काही स्त्रिया शेतीत काम करणाऱ्या, काही नोकरी करणाऱ्या तर काही शिक्षण क्षेत्रातील आहेत. अशाप्रकारे प्रतिमा इंगोले यांनी स्त्री-दुःखाची विविध क्षेत्रांतील विविध रूपे आपल्या कथांकधून रेखांकित केली आहेत.

## संदर्भग्रंथ

1) प्रतिमा इंगोले, 'अंधारपर्व' , 1999- पृ. 5

2) र. बा. मंचरकर, 'लेकीचे कर्तृत्व' , संपा.- विमलताई कुकडे, प्रथमावृत्ती 2002

3) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, 'ग्रामीण साहित्य - स्वरूप आणि शोध' , 1985. पृ.7

4) श्रीराम गुंदेकर, दै. 'महासत्ता' , कोल्हापूर,

5) ना. सी. फडके, 'लघुकथा फडके, लघुकथा तंत्र आणि मंत्र पुर्नमुद्रण 1968, पृ.156

6) अंजली सोमण, 'मराठी कथेची स्थितीगती' , 1995, पृ. 193

7) अनुराधा गुरव, दै. 'लोकमत' दि. 14 जुलाई 1991 , पुरवणी , पृ.3

8) डॉ. आनंद यादव, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या' , 1993, पृ.9

9) प्रतिमा इंगोले, 'सुगरनचा खोपा' , 1989, पृ.19-20

10) तत्रैव

11) तत्रैव

12) प्रतिमा इंगोले, 'हिरवे स्वप्न' ,1994 पृ. 10

13) सुधा जोशी, 'कथा : संकल्पना आणि समीक्षा' , 2000, पृ. 10

14) म. द. हातकणंगलेकर, 'मराठी कथा : रूप आणि स्वरूप' , प्रथम आवृत्ती 1986 पृ.30

15) स. शि. भावे, 'आशय आणि आविष्कार' , संपादक प्रल्हाद वडेर, प्रथमावृत्ती 1988, प्र. 28

16) फ. म. शहाजिंदे, दै. 'लोकसत्ता' , 1990

17) डॉ.श्रीराम गुंदेकर - 'अक्षरवैदर्भी' , मासिक फेब्रु 1991 (लेख)

18) सौ.प्रतिमा कुलकर्णी - 'प्रतिभासंपन्न प्रतिमा इंगोले' , दै. 'जनवाद' , दि.4/2/1994

19) अनुराधा गुरव, दै. 'लोकमत' , रविवार, दि. 14 जुलै 1991,

20) डॉ. वासुदेव मुलाटे, 'ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास' , पृ. 335